मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २०३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना महानगरपालिकेत कॅबिन वॉर पेटले; प्रशासनाची डोकेदुखी वाढली!

## केवळ केबिन आणि प्रतिष्ठेसाठी अधिकाऱ्यांना वेठीस धरणे कितपत योग्य

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या राजकारणात सध्या जनहिताच्या प्रश्नांऐवजी केबिन मिळवण्यावरून मोठे नाट्य रंगले आहे. नवनियुक्त सभापती आणि उपसभापती यांच्या निवडीनंतर आता कार्यालयात जागा अपुरी पडू लागल्याने लोकप्रतिनिधींमध्ये युद्ध सुरू झाले असून, या वादात प्रशासकीय अधिकारी मात्र चांगलेच भरडले जात आहेत. विशेषतः अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांच्यासमोर या केबिन वाटपाने मोठी डोकेदुखी निर्माण केली आहे.

**विद्युत विभागाच्या केबिनवर दावा**

मिळालेल्या माहितीनुसार, पाणीपुरवठा सभापती पूनम स्वामी यांनी पूर्वीच्या विद्युत विभागाच्या केबिनवर आपला दावा ठोकला आहे. मागील काळात ही केबिन त्यांच्याकडे असल्याने त्यांनी पुन्हा त्याच जागेसाठी आग्रह धरला आहे. दुसरीकडे, इतर नवनियुक्त सभापतींना अद्याप स्वतंत्र दालन उपलब्ध नसल्याने पालिकेच्या गोटात तणावाचे वातावरण आहे. अधिकाऱ्यांची अवस्था इकडे आड तिकडे विहीर अशी झाली असून, नेमकी कुणाची बाजू घ्यावी, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे.

**विरोधी पक्षही मैदानात; केबिनचा तिढा वाढणार**

केवळ सत्ताधारीच नव्हे, तर आता शिवसेनेचे विरोधी पक्षनेते आणि गटनेते यांनीही आपल्याला हक्काचे दालन मिळावे, यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.
विरोधी पक्षनेत्यांना केबिन नसल्याने ते लवकरच केबिनवर दावा ठोकण्याची शक्यता आहे. यामुळे येणाऱ्या काळात हा केबिनचा प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

**पतीराजांचा हस्तक्षेपः महिला आरक्षणाचा मूळ हेतू धोक्यात?**

या संपूर्ण वादात एक अत्यंत गंभीर बाब समोर आली आहे, ती म्हणजे पतीराज संस्कृती. अनेक महिला सभापतींच्या ऐवजी त्यांचे पतीच महापालिकेत मोर्चा सांभाळताना दिसत आहेत. केबिनसाठी अधिकाऱ्यांना धारेवर धरणे असो किंवा प्रशासकीय कामात हस्तक्षेप करणे, असे निर्णय पती किंवा नातेवाईकच घेत असल्याचे चित्र आहे. निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींच्या अधिकारांवर गदा आणणाऱ्या या पतीराजांवर प्रशासन काय कारवाई करणार? जनतेच्या प्रश्नांऐवजी केवळ केबिन आणि प्रतिष्ठेसाठी अधिकाऱ्यांना वेठीस धरणे कितपत योग्य आहे?

अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची या वादाने झोप उडवली आहे. नियमानुसार दालनांचे वाटप करताना सर्वांचे समाधान कसे करायचे, हा यक्षप्रश्न त्यांच्यासमोर आहे. एका बाजूला लोकप्रतिनिधींचा दबाव आणि दुसऱ्या बाजूला अपुरी जागा, अशा कात्रीत प्रशासन अडकले आहे.

आता या केबिन वॉरवर तोडगा निघतो की हे युद्ध अधिकच उग्र रूप धारण करते, याकडे संपूर्ण जालना शहराचे लक्ष लागले आहे. तसेच, प्रतिनिधी महिला असताना त्यांच्या वतीने पतींनी कारभार पाहणे, यावर शासन काही कडक पावले उचलणार का? हा प्रश्नही आता ऐरणीवर आला आहे.

> पतीराज संस्कृती. अनेक महिला सभापतींच्या ऐवजी त्यांचे पतीच महापालिकेत मोर्चा सांभाळताना दिसत आहेत



नागरिकांच्या प्रश्नांवर मनपा महापौरांची स्पष्ट भूमिका

# विकासकामांबाबत दिले ठोस आश्वासन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील वाढत्या नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर मनपा महापौरांनी माध्यमांशी संवाद साधत प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली. विविध भागांतून पाणीटंचाई, स्वच्छता, रस्त्यांची दुरवस्था आणि इतर मूलभूत सुविधांबाबत नागरिकांकडून होत असलेल्या तक्रारींवर महापौरांनी सविस्तर भाष्य केले.
महापौरांनी सांगितले की, शहरातील सर्व प्रलंबित कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्नशील आहे. काही ठिकाणी तांत्रिक अडचणी आणि निधीअभावी कामांमध्ये विलंब होत असला, तरी त्या अडचणी दूर करण्यासाठी विशेष पातळीवर पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पाणीपुरवठ्याच्या समस्येबाबत बोलताना त्यांनी




सांगितले की, शहरातील काही भागांत तात्पुरती अडचण निर्माण झाली असली तरी लवकरच परिस्थिती सुरळीत करण्यात येईल. स्वच्छता मोहिमेअंतर्गत शहरात नियमित साफसफाई सुरू असून, नागरिकांनीही स्वच्छतेबाबत सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच, अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण आणि नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शहराच्या विकासासाठी पारदर्शक आणि जबाबदार प्रशासन देण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही महापौरांनी नमूद केले.

दरम्यान, नागरिकांकडून काही भागांत कामांची गती मंद असल्याची नाराजी व्यक्त होत असून, प्रशासनाने अधिक वेगाने आणि प्रभावीपणे कामे पूर्ण करावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# इराण युद्धात 'ई २० पेट्रोल' का चर्चेत?

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत सांगितलं मोठं कारण

**मुंबई -** पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. कच्च्या तेलाच्या किमती वाढत असताना भारतासारख्या आयातदार देशांवर त्याचा थेट परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत भारतात ई २० पेट्रोल पुन्हा चर्चेत आलं आहे. लोकसभेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ई २० पेट्रोलचा उल्लेख करत, ऊर्जा संकटाच्या काळात हा उपाय देशासाठी फायदेशीर ठरत असल्याचा दावा केला.
पंतप्रधान मोदी यांनी सांगितलं की, पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याच्या धोरणामुळे भारताचा तेल आयात मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. त्यांच्या मते, गेल्या १०-११ वर्षांत इथेनॉल उत्पादन आणि मिश्रण क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे. याचमुळे भारताला ऊर्जा संकटाचा फटका काही **पान २ वर**

'घाणीचे साम्राज्य, प्रशासन झोपेत?' प्रभाग ९ मध्ये संताप उसळला

# ८ दिवसांत काम नाही तर आंदोलन - ढक्का

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील स्वच्छतेचा प्रश्न आता अत्यंत गंभीर टप्प्यावर पोहोचला असून संपूर्ण परिसरात अक्षरशः घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र समोर आले आहे. नाल्यांचे सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत असून दुर्गंधी, अस्वच्छता आणि वाढत्या आजारांच्या भीतीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर नगरसेवक महावीर ढक्का यांनी महानगरपालिका प्रशासनावर जोरदार हल्लाबोल करत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. माध्यमांशी बोलताना ढक्का यांनी **पान २ वर**



माजी आ.कैलास गोरंटयाल यांच्या वाढदिवसा निमित्त भरगच्च कार्यक्रम

# स्वच्छता कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी व गणवेश वाटप करणार

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांच्या आगामी वाढदिवसाचे औचित्य साधून जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती उपमहापौर राजेश राऊत यांनी दिली आहे.

महानगरपालिका परिसरात दि.९ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ वाजता हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च महापौर, उपमहापौर व सभापती हे आपल्या वैयक्तिक स्तरावर करणार आहेत.या उपक्रमा अंतर्गत महानगर पालिकेतील सर्व स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता कर्मचारी, तसेच घंटागाडी व इतर स्वच्छता वाहनांवरील खासगी कर्मचारी आणि वाहनचालक यांची मोफत आरोग्य व नेत्र तपासणी केली जाणार असून



शहरातील स्वच्छता राखणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना याप्रसंगी नवीन गणवेश प्रदान करण्यात येणार आहेत. जे कर्मचारी विविध शासकीय योजनांसाठी पात्र आहेत, त्यांची जागेवरच नोंदणी करून त्यांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून दिला जाणार आहे. सदर कार्यक्रम जालना शहर महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती वंदना अरुण मगरे, उपमहापौर राजेश राऊत, आरोग्य व स्वच्छता सभापती कपिल भुरेवाल आणि आरोग्य व स्वच्छता उपसभापती सौ. अनामिका विजय पांगारकर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान,शहराला स्वच्छ ठेवणाऱ्या आपल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे.माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या वाढदिवसा निमित्त या सेवाभावी उपक्रमातून आम्ही कृतज्ञता व्यक्त करत आहोत असे महापौर श्रीमती वदंना अरुण मगरे व उपमहापौर राजेश राऊत यांनी म्हटले आहे.

# 'स्वच्छतेसाठी मनपा ॲक्शन मोडमध्ये!'

## उशीर चालणार नाही, ६ वाजेपूर्वी हजेरी बंधनकारक, महापौरांचा कडक इशारा

**जालना । प्रतिनिधी -** शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर असताना जालना महानगरपालिकेने अखेर कडक भूमिका घेत 'ॲक्शन मोड'मध्ये प्रवेश केला आहे. शहर स्वच्छ व सुंदर बनवण्याच्या दृष्टीने आज महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व उपसभापती यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वच्छता विभागाची अत्यंत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत प्रशासनाला शिस्त, जबाबदारी आणि कामगिरीबाबत कडक निर्देश देण्यात आले असून, ''कामात हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही'' असा स्पष्ट इशाराच देण्यात आला.

बैठकीत शहरातील सध्याची स्वच्छता व्यवस्था, कचरा संकलन, नालेसफाई, मनुष्यबळाची कमतरता आणि यंत्रसामग्रीची स्थिती यांचा सखोल आढावा घेण्यात आला. नागरिकांकडून वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाला अधिक वेगाने आणि नियोजनबद्ध काम करण्याचे आदेश देण्यात आले.

**६ वाजेपूर्वी हजेरी अनिवार्य; शिस्तीवर भर**

स्वच्छता व्यवस्थेत शिस्त आणण्यासाठी सर्व स्वच्छता निरीक्षक आणि मुकादम यांना दररोज सकाळी ६.०० वाजेपूर्वी आपल्या विभागातील सफाई कर्मचाऱ्यांची हजेरी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, घंटागाडी चालकांची हजेरीही सकाळी ६ वाजता घेऊन त्याचा अहवाल अधिकृत ग्रुपवर अपलोड करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कामात दिरंगाई किंवा अनुपस्थिती आढळल्यास संबंधितांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला.

**कचरा संकलनावर कडक नजर; नादुरुस्त वाहनांची तातडीने दुरुस्ती**

शहरातील कचरा संकलन वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी नादुरुस्त घंटागाड्याविशेषतः इलेक्ट्रिक वाहनंतातडीने दुरुस्त करण्याचे आदेश वाहन विभागाला देण्यात आले आहेत. प्रत्येक भागात घंटागाडी वेळेवर पोहोचते की नाही, याची जबाबदारी थेट स्वच्छता निरीक्षकांवर टाकण्यात आली आहे. त्यामुळे आता कचरा उचलण्यात होणारा विलंब थांबवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**पावसाळ्यापूर्वी नालेसफाई मोहीम; जिओ-टॅगिंग सक्तीचे**

दरवर्षी पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पूरस्थितीचा धोका टाळण्यासाठी यंदा आगाऊ तयारीवर भर देण्यात आला आहे. शहरातील लहान-मोठ्या सर्व नाल्यांची नियमित साफसफाई करून त्यातील गाळ तात्काळ उचलण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासोबतच, मुख्य रस्त्यांवरील कचरा डेपो हटवून 'आधी' आणि 'नंतर' असे जिओ-टॅग फोटो काढणे अनिवार्य करण्यात आले आहे. या सर्व नोंदींचे स्वतंत्र रजिस्टर आणि फाईल अद्ययावत ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. यामुळे कामाची पारदर्शकता वाढणार असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

**'बदली लेबर'वर कारवाई; पारदर्शकतेसाठी कठोर पावले**

स्वच्छता विभागात काही ठिकाणी कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांच्या जागी बदली लेबर ( ) काम करत असल्याच्या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने यावर कडक भूमिका घेतली आहे. अशा प्रकार आढळल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे भ्रष्टाचारावर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**सफाई कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबीर; ९ एप्रिलला विशेष उपक्रम**

शहर स्वच्छ ठेवणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत ९ एप्रिल २०२६ रोजी विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. या शिबिरात सर्व कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी केली जाणार असून, आवश्यक उपचार व मार्गदर्शन दिले जाईल.

**कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका**

या बैठकीत स्वच्छता निरीक्षक व कर्मचाऱ्यांनी मांडलेल्या



अडचणींवरही प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता प्रत्येक वार्डात मनुष्यबळ आणि घंटागाड्यांची संख्या वाढवण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तसेच, प्रत्येक १५ दिवसांनी वार्डनिहाय जेसीबी, लोडर आणि टिप्पर उपलब्ध करून देण्याच्या मागणीवरही सकारात्मक विचार सुरू असल्याचे संकेत देण्यात आले.

**सुरक्षा साधने व गणवेश लवकरच**

सफाई कर्मचाऱ्यांना काम करताना सुरक्षितता मिळावी यासाठी गमबूट, हँडग्लोव्हज, मास्क यांसारखी सुरक्षा साधने, तसेच नवीन गणवेश आणि साड्या लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे आश्वासन बैठकीत देण्यात आले.

**'स्वच्छ जालना, सुंदर जालना'साठी नागरिकांनाही आवाहन**

महानगरपालिकेने केवळ प्रशासनच नव्हे तर नागरिकांनीही स्वच्छतेच्या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले आहे. कचरा योग्य ठिकाणी टाकणे, स्वच्छता राखणे आणि प्रशासनाला सहकार्य करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, मनपाने घेतलेल्या या कडक निर्णयांमुळे शहरातील स्वच्छता व्यवस्थेत प्रत्यक्ष सुधारणा होते का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# क्षयरोग मुक्त भारत देश करूया

भारत सरकारने सन २०२५ पर्यंत क्षयमुक्त भारत देश करण्यासाठी सर्वच क्षेत्रामध्ये महत्वाची पावले उचलली आहे. याकरीता आपणांस प्रत्येक क्षयरुग्णांपर्यंत पोहोचलो तरच आपण क्षयरोग मुक्त भारत देश करु शकतो. जालना जिल्ह्यातील २०२५ या वर्षातील क्षयरोगाबाबतची स्थिती खालीलप्रमाणे आहे. वर्ष २०२५ मध्ये एकुण शोधण्यात आलेले क्षयरुग्ण २३३५, बरे झालेले क्षयरुग्ण ११२६, उपचारावर असणारे क्षयरुग्ण ११५४ या वर्षीचे आपले उदिद्ष्ट १०० टक्के पुर्ण करण्यासाठी आपल्या सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहे. या प्रमुख उदेद्शानेच क्षयरोगाबाबतची माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

क्षयरोगाचे भारतातील प्रमाण :- प्रत्येक दोन मिनिटाला एक रुग्ण क्षयरोगाने मरण पावतो. एक थुंकी दुषित रुग्ण वर्षभरात १० ते १५ लोकांना क्षयरोगाचा प्रसार करतो. यामुळे क्षयरुग्ण संख्येत वाढ होत आहे. यामुळे या क्षयरोगास गांर्भीयाणे घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण उद्याचा भारत देश क्षयरोग मुक्त असला पाहिजे. क्षयरोग म्हणजे कायघ्ृ. क्षयरोग हा मायकोबॅक्टेरियम टयुबरक्युलोसिस नावांच्या जंतुमुळे होतो. या जंतुचा शोध डॉ.रॉबर्ट कॉक या शास्त्रज्ञाने २४ मार्च-१८८२ रोजी लावला हे जंतु मुख्यतः फुप्फूसांवर परिणाम करतात. त्यामुळे फुप्फूसाचा क्षयरोग होतो. परंतु काही रुग्णांमध्ये शरीराच्या इतर भागावरही उदा. हाडे, मज्जातंतु, सांधे, लिम्फनोड, इत्यादी या जंतुचा परिणाम होतो.

क्षयरोग कसा पसरतो :- मायकोबॅक्टेरियम टयुबरक्युलोसिस हे क्षयरोगाचे जंतु हवेतुन पसरतात (ड्रॉपलेट इन्फेक्शन). फुप्फुसाचा क्षयरोग असलेला रुग्ण जेंव्हा खोकतो किंवा शिंकतो तेंव्हा क्षयरोगाचे हे जंतु हवेत पसरतात व ज्यावेळी निरोगी मनुष्य श्वास घेतो तेंव्हा हे जंतु त्याच्या शरीरात श्वसनमार्गे प्रवेश करतात व ज्यावेळी त्या व्यक्तीची प्रतिकारशक्ती कमी होते, त्यावेळी क्षयरोगाचे लक्षणे दिसुन येतात.

क्षयरोगाचे लक्षणे :-

अ) सर्वसाधारण व्यक्ती :- २ आठवड्यापेक्षा जास्तीचा खोकला, संध्याकाळी ताप येणे, वजनात घट, भुक मंदावणे , छातीत दुखणे, खोकल्यातून किंवा थुंकीतून रक्त पडणे.

ब) अति जोखमीच्या व्यक्ती :- थुंकी दुषित रुग्णांच्या संपर्कातील व्यक्ती, मधुमेही, एच.आय.व्ही.बाधीत रुग्ण, कुपोषित व्यक्ती, प्रतिकार शक्ती कमी असलेले, धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती, स्टेरॉईड औषध घेणाऱ्या व्यक्ती, मुत्रपिंडाचे आजार असणाऱ्या व्यक्ती, फुप्फुसाचे इतर आजार असणाऱ्या व्यक्ती (दमा) यांना एक दिवसाचा जरी खोकला असला तरी ती क्षयरोगाची संशयीत व्यक्ती आहे म्हणुन त्यांनी क्षयरोगाची तपासणी करावी.

फुफुसाव्यतिरिक्त क्षयरोग :- मानेवर सुज व गाठी, मज्जातंतू, हाडे, सांधे, पाठीचे मणके इ. शरीराच्या अवयवांना क्षयरोग होतो, याला पुपुसाव्यतीरीक्त क्षयरोग म्हणतात. क्षयरोगाचे निदान :-फुप्फुसाच्याक्षयरोगाचे निदान हे थुंकी (बेडका) तपासणीव्दारे व छातीचा क्ष-किरण तपासणी करुन केले जाते.यामध्ये संशयीत क्षयरुग्णांची दोन बेडका नमुने तपासणीसाठी घेतले जातात. सुक्ष्मदर्शकाखाली दोन्ही थुंकी नमुन्यावर प्रक्रिया करुन तपासणी केली जाते.संबधीत रुग्णाची बेडका तपासणी व छातीचा क्ष-किरण तपासणी केल्यानंतरसदरील रुग्ण पॉझिटीव्ह असल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत डॉट्स औषधोपचार सुरु करण्यात येतात. तसेच सिबीनॅट तपासणीही करतात. वरील सर्व तपासण्या शासकीय रुग्णालयात मोफत केल्या जातात.

औषधोपचार :- राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत डॉटस् औषधोपचार प्रणालीचा वापर केला जातो. या औषधोपचार प्रणालीमध्ये क्षयरुग्णांना वजनाप्रमाणे औषधोपचार हे या औषधोपचार पध्दतीचे मुख्य वैशिष्टये आहे. वजन गट रुग्णांचे प्रकार अतिदक्षता काळात दिला जाणारा औषधोपचार पध्दत नियमित काळात दिला जाणारा औषधोपचार क्षयरुग्णांना शासनामार्फत मोफत देण्यात येतो. डॉटस् औषधोपचार पध्दतीमुळे जिल्हयातील जास्तीत जास्त क्षयरुग्ण बरे होत आहेत व ही क्षयरोगावरील प्रभावी औषधोपचार पध्दती ठरत आहे. डि.आर.टिबी :- जालना जिल्ह्यात दिनांक १४ फेब्रुवारी २०११ पासून डि.आर.टिबी औषधोपचार प्रणाली सुरु करण्यात आली आहे. क्षयरुग्णांनी डि.एस.टिबी औषधोपचार प्रणालीप्रमाणे व्यवस्थित औषधी न घेतल्यास, कोणताही फॉलोअप स्पुटम पॉझिटिव्ह, डिफॉल्टर, फेल्युअर, रिलॅप्स केस, एचआयव्ही बाधीत अशा केसच्या संशयित क्षयरुग्णांना डि.आर.टिबी संशयीत क्षयरुग्ण म्हणतात. डॉट प्लस साइट येथे रुग्णाच्या विविध शारीरीक व रक्ताची तपासणी केली जाते. तसेच रुग्णांना पीएमडीटी अंतर्गत औषधे व्यवस्थितरीत्या रुग्णाच्या शरीरास लागू होतात किंवा नाही याची खात्री केल्या जाते. डॉट प्लस साईटने ठरवून दिलेल्या नुसारच औषधोपचार ६ ते २० महिने दिल्या जातो. तसेच नविन औषधी बिडाक्युलीन व डेलामॅनीड हे औषधी क्षयरोगावर अत्यंत प्रभावी ठरत असुन हे रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. तसेचशासन सदर औषधी क्षयरुग्णास मोफत पुरवठा करते. सिबीनॅट / ट्रनॅट प्रयोगशाळा :- ०१ मे २०१६ पासुन जालना जिल्ह्यात मोफत सिबीनॅट व ट्रनॅट तपासणीची सुविधा पुरविण्यात येत आहे. सद्यस्थितीमध्ये जालना जिल्हयात सिबीनॅट व ट्रनॅटव्दारे तपासणी सुविधा खालील १८ ठिकाणी उपलब्ध आहेत. जालना जिल्हयातील सिबीनॅट मशिन साईट उपजिल्हा रुग्णालय अंबड, सामान्य रुग्णालय, जालना, जिल्हा क्षयरोग केंद्र, जालना, ग्रामिण रुग्णालय घनसावंगी, ग्रामिण रुग्णालय परतुर, तर जालना जिल्ह्यातील ट्रनॅट मशिन साईट ग्रामिण रुग्णालय बदनापुर, ग्रामिण रुग्णालय मंठा, ग्रामिण रुग्णालय जाफ्राबाद, सामान्य रुग्णालय जालना, ग्रामिण रुग्णालय राजुर, ग्रामिण रुग्णालय टेंभुर्णी, वैद्यकीय महाविद्यालय वरुडी ता.बदनापुर, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय अंबड, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय बदनापुर, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय भोकरदन, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय घनसावंगी, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय परतुर, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मंठा या प्रयोगशाळेत सर्व नवीन क्षयरुग्ण कोणताही फॉलोअपस् स्पुटम पॉझिटीव्ह, डिफॉल्टर, फेल्युअर, रिलॅप्स केस, लहान बालके, ईपी केसेस, एचआयव्ही बाधीतक्षयरुग्णांची मोफत केली जाते. क्षयरुग्णांचे निदान तो कोणता क्षयरोग आहेघ् औषधास दाद देणारा किंवा औषधाला दाद न देणारा म्हणजेच डि.आर. टिबी आहे, हे पाहण्यासाठी रुग्णांची प्रयोगशाळेत तपासणी केली जाते. या प्रयोगशाळेत सर्व शासन यंत्रणेत क्षयरोगाचा औषधोपचार घेणारे क्षयरुग्ण व खाजगी रुग्णालयात क्षयरोगाचा उपचार घेणारे क्षयरुग्ण यांची मोफत तपासणी केली जाते. सदर तपासणी खाजगी प्रयोगशाळेत केली असता त्यासाठी साधारण ३ ते ४ हजार रुपये खर्च येतो, ही सेवा शासनामार्फत सर्व क्षयरुग्णांना उपरोक्त ठिकाणी मोफत देण्यात येत आहे. निक्क्षय पोषण आहार योजना :-०१ एप्रिल-२०१८ पासुन भारत सरकारने क्षयरुग्णांसाठी निक्क्षय पोषण आहार योजनेची सुरवात केली आहे. या योजनेअंतर्गत शासकीय यंत्रणेकडे क्षयरोगाचा उपचार घेणारा क्षयरुग्ण किंवा खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेणारा क्षयरुग्ण संपुर्ण क्षयरोग उपचार पुर्ण होईपर्यंत प्रती महिना १०००/- रु.असे मानधन सकस पोषण आहार घेण्याकरीता क्षयरुग्णांच्या बँक खात्यामध्ये डीबीटीव्दारे जमा करण्यात येते. वर्ष २०२५ मध्ये जालना जिल्हयामध्ये शासकीय व खाजगी यंत्रणेकडे क्षयरोगाचा उपचार घेणाऱ्या २३६४ क्षयरुग्णांना ५३,८६,०००/- रु. इतके अनुदान जिल्हा क्षयरोग केंद जालना मार्फत क्षयरुग्णांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात आले आहेत.

टिबीमुक्त भारत अभियान :-भारत सरकारने दिनांक ०९ सप्टेंबर-२०२२ पासुन 'टिबीमुक्त भारत अभियान' ची सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत उपचारावर असणाऱ्या क्षयरुग्णांना तसेच रुग्णांच्या गरजेनुसार मदत ही जिल्हयातील सिएसआर अंतर्गत येणाऱ्या औद्योगीक संस्था, सिड् स कंपन्या, दानशुर व्यक्ती इत्यादींना 'निक्क्षय मित्र' बनवुन 'कम्युनिटी सपोर्ट टु टिबी पेशंटस' या योजनेअंतर्गत क्षयरुग्णांना मदत पुरविली जात आहे. माहे वर्ष-२०२२ ते आजपर्यंत उपचारावर असणाऱ्या क्षयरुग्णांना १९०४६ कोरड्या पोषण आहार किटचे वाटप जालना जिल्हयातील विविध एनजीओ, जालना स्टील मेन्युफैक्चरिंग असोसिएशन, सामाजिक संस्था, दानशुर व्यक्ती इत्यादींनी क्षयरुग्णांना मदत केलेली आहे.

प्रतिबंधात्मक उपाय योजना :- इंग्रजीमध्ये एक म्हण आहे कोणत्याही आजाराला बरे करण्यापेक्षा त्याला प्रतिबंध करणे केंव्हाही चांगले. त्यासाठी खालील उपाययोजना आहेत. १.नवजात बालकांचे १०० टक्के बी.सी.जी.चे लसीकरण झाले पाहिजे. २.आपला आहार संतुलीत सकस प्रथीनेयुक्त असावा. ३.व्यसनांपासून दुर राहणे (धुम्रपान, दारु, तंबाखु) ४.थुंकी दुषित क्षयरुग्णांनी तोंडाला रुमाल किंवा एन-९५ मास्क बांधणे. ५. संशयीत क्षयरुग्णाला शोधुन लवकर रोग निदान व औषधोपचार करणे. ६.स र्व फुप्फुसाच्या क्षयरुग्णांच्या संपर्कातील व्यक्तींना वजनानुसार गोळ्या ०६ महिने घेणे आवश्यक आहे. ७.नातेवाईक, मित्र-मंडळी व घरातील इतर व्यक्तींनी सदर रुग्ण नियमित औषधोपचार घेतो की नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कारण एक थुंकीदुषित क्षयरुग्ण १० ते १५ लोकांना क्षयरोगाची बाधा करतो. ८.मधुमेह व इतर आजारांचे नियमित उपचार घेणे. २४ मार्च जागतिक क्षयरोग दिन २०२६ चे घोषवाक्य खालीलप्रमाणे आहे. '' होय ! आपण क्षयरोगाचा अंत करू शकतो : नेतृत्व जालना जिल्हा, समर्थीत जनभागीदारी''

**- डॉ. जी. एम. कुडलीकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी, जालना**

## वणवे रोखा निसर्गसंपदा वाचवा!

उन्हाळा जसा तापू लागतो तसे वन खात्याच्या जंगलांना आगी लागण्याच्या घटनात वाढ होते. आताही राज्यात कोठेणा कोठे वन खात्याच्या जंगलांना आगी लागून वणवे पेटल्याच्या बातम्या वर्तमान पत्रात वाचायला मिळतात. काही वेळा या आगी वेळीच आटोक्यात येतात पण बऱ्याचदा या आगी वेळीच आटोक्यात न आल्याने त्या रौद्र रूप धारण करतात आणि त्याचे रूपांतर मोठ्या वणव्यात होते आणि त्यात बहुमोल अशी निसर्ग संपदा जळून खाक होते. तीन वर्षापूर्वी गोव्यातील महादयी वन्यजीव अभयारण्याला भीषण आग लागली होती. जगातील आठ जैवविविधता हॉटस्पॉट पैकी एक असलेल्या पश्चिम घाटाचा हा विस्तिर्ण भाग गोव्याच्या इतिहासातील सर्वात भीषण आगीमुळे उध्वस्त झाला होता. मागील वर्षी पुणे जिल्ह्यातील वन खात्याच्या जंगलातही वणवे पेटण्याच्या अनेक घटना घडल्या त्यात शेकडो एकर जंगलातील बहुमोल अशी निदर्गसंपदा जळून खाक झाली होती. आताही पुण्यातील पुण्यातील वनखात्याच्या जंगलात वणवे पेटल्याच्या बातम्या वर्तमान पत्रात वाचायला मिळत आहेत. वणवा पेटला की त्यात निसर्गाची कधीही न भरून येणारी हानी होते. साधारणतः उन्हाळ्यात या आगी लागतात आणि वणव्यांमुळेच या आगी लागतात. सामान्यतः सदाहरित जंगलांमध्ये आगी लागत नाही आग लागली तरी ती आपोआप विझतेही मात्र जोराने वारे वाहत असतील तर आग लवकर विझत नाही उलट ती आणखी वाढते. वनांमध्ये वाळलेले लाकूड, पाने, गवत असे अनेक घटक ठिणगीच्या संपर्कात येताच आग भडकते. मग झाडे पेट घेतात आणि मग मोठ्या वेगाने हा वणवा सर्वत्र पसरतो. डोंगराळ भागाचा भूगोल आणि भूरचना जटिल असल्यामुळेही वणवे विझवण्यात अनेकदा अडथळे येतात. गोव्यात तेच झाले. दुर्गम परिसर आणि खडे चढण यामुळे तेथील आग विझवण्यात अडचण आल्याचे सांगितले गेले. अर्थात जंगलांना आगी लागण्याच्या या घटना नव्याही नाहीत. गेल्या काही वर्षात वणवे लागण्याचे प्रमाण ज्याप्रकारे वेगाने वाढत आहे तो एक नव्या संकटाचा इशारा आहे. नैसर्गिक कारणामुळे जंगलांना वणवे लागण्याच्या घटना तर घडतातातच पण मानवनिर्मित वणवे लागण्याचा घटनांची संख्याही प्रचंड आहे. दरवर्षी उन्हाळा आला की जंगलांना आग लागण्याच्या घटना घडतात आणि त्यात बहुमोल अशी निसर्गसंपदा नष्ट होते केवळ जंगलांनाच नाही तर डोंगर, पर्वत, टेकड्यांवरील वृक्ष, वेली देखील या वनव्यांनी नष्ट होतात. विविध महापालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती, राज्य व केंद्र शासन, राजकीय, सामाजिक व सेवाभावी संघटना पावसाळ्यात वृक्षारोपण करतात. पावसाळ्यानंतरही ही वनसंपदा जतन करण्यासाठी या संघटना रोपट्यांना पाणी घालून ते वाढवतात. गाई, गुरे, बकऱ्यांपासून त्यांना जपतात. मात्र उन्हाळ्यात ठिकठिकाणी वणवे लागून व काही समाजकंटकामार्फत वणवे लावून वर्षानुवर्षे वाढवली गेलेली ही बहुमोल निसर्गसंपदा आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असते. उन्हाळ्यात लागणारे हे वणवे नैसर्गिक असल्याचे भासवले जाते पण हे यातील बरेचसे वणवे मानवनिर्मितच असतात हे उघड सत्य आहे. काही समाजकंटक जाणीवपूर्वक शहराजवळच्या डोंगरावरील हिरवाईला वणवे लावून ती नष्ट करतात. चराई करिता चांगले गवत यावे या हेतूने हे वणवे लावले जातात. ( आग लागल्यावर चांगले व भरपूर गवत उगवते हा त्या मागचा उद्देश असतो. ) लाकूडफाटा, कोळसा मिळवण्यासाठी तसेच शेती व शिकारीसाठी जमीन तयार करण्यासाठी या बहुमोल निसर्ग संपदेला आगी लावल्या जातात. या आगीत वृक्ष, वनस्पती, वन्य जीवांची हानी, स्थलांतर यामुळे जे नुकसान होत असते त्याची भरपाई होण्यास खूप वर्षाचा कालावधी जातो. निसर्गाची अपरिमित हानी होते. या आगीमुळे पर्यावर्णाची हानी तर होतेच पण कार्बनडायऑक्साईडही वातावरणात वाढतो त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. एकूणच झाडांना लावल्या जाणाऱ्या या आगी म्हणजे राष्ट्रीय हानी आहे. असे असतानाही या मानवनिर्मित वणव्यांकडे केंद्र व राज्याचे वने आणि पर्यावरण खाते, पोलिसखाते दुर्लक्ष करीत असतात. आगी लावणाऱ्या या समाजकंटकांवर पोलीस तसेच प्रशासन कोणतीही कारवाई करीत नाही त्यामुळेच वणव्यांच्या घटनांत वाढ होताना दिसत आहे. काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामुळे निसर्गाची कधीही भरून न निघणारी हानी होत आहे, म्हणूनच सरकारने या वणव्यांची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. वणवे लावून पर्यावरणाची हानी करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई व्हायला हवी. वणव्यांमुळे पर्यावरणाची होणारी हानी टाळायची असेल तर मानवनिर्मित वणवे रोखायलाच हवे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

# मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष: व्यसनी भावाची हत्या, जन्मठेपेच्या शिक्षेवर सुनावणी

आपल्या सख्ख्या भावाच्या व्यसनाधीनतेला आणि रोजच्या त्रासाला कंटाळून त्याची हत्या करणाऱ्या हेमंत देवरुखकर याला सत्र न्यायालयाने सुनावलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या प्रकरणात आरोपीने केलेला गुन्हा हा पूर्वनियोजित खून नसून, गंभीर आणि अकस्मात झालेल्या प्रक्षोभामुळे घडलेला सदोष मनुष्यवध आहे, असा युक्तिवाद आरोपीच्या वकिलांनी केला. त्यामुळे या खटल्याच्या अंतिम निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मूळ प्रकरणानुसार, मुंबईतील कांजूरमार्ग येथे राहणारा हेमंत देवरुखकर हा त्याचा भाऊ साईनाथ याच्या तंबाखू, गांजा आणि धूम्रपानाच्या व्यसनामुळे त्रस्त होता. साईनाथ घरात कुठेही थुंकत असे आणि यावरून घरात रोज भांडणे होत होती. घटनेच्या आदल्या रात्रीही दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी, १३ एप्रिल २०१८ रोजी, हेमंतने झोपेत असलेल्या साईनाथच्या डोक्यात सिमेंटच्या ब्लॉकने हल्ला केला. ''रोजची भांडणे संपवली,'' असे तो आपल्या आईला म्हणाला. उपचारादरम्यान साईनाथचा मृत्यू झाला, ज्यानंतर सत्र न्यायालयाने हेमंतला खुनाच्या गुन्ह्यासाठी भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३०२ (आता भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १०३) अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपिलात, आरोपीच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, हा गुन्हा पूर्वनियोजित नव्हता. मृत साईनाथच्या सततच्या त्रासाला, शिवीगाळ आणि मारहाणीला कंटाळून, तसेच घटनेच्या आदल्या रात्री झालेल्या भांडणामुळे आरोपी भावनिकदृष्ट्या खचला होता. रागाच्या भरात आणि गंभीर व अकस्मात प्रक्षोभामुळे त्याच्या हातून हे कृत्य घडले. त्यामुळे हा गुन्हा खुनाचा नसून, सदोष मनुष्यवध आहे. यासाठी चे कलम ३०४ (आता चे कलम १०५) अंतर्गत कमी शिक्षा देण्यात यावी, अशी विनंती करण्यात आली.

या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशन, जालनाचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धनावत म्हणाले, ''हे प्रकरण कायदा आणि समाज या दोन्हींसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कायद्यानुसार, खून आणि सदोष मनुष्यवध यांच्यात स्पष्ट फरक आहे. आरोपीचा उद्देश, गुन्ह्यामागील कारण आणि त्यावेळची मानसिक स्थिती यावर सर्व काही अवलंबून असते. जर एखादे कृत्य गंभीर आणि अचानक झालेल्या प्रक्षोभामुळे, कोणताही पूर्वविचार न करता घडले असेल, तर न्यायालय त्याला खुनाच्या गुन्ह्यातून वगळून सदोष मनुष्यवधाच्या श्रेणीत आणू शकते. व्यसनाधीनतेमुळे एका कुटुंबाचा कसा नाश होतो, हे या प्रकरणातून पुन्हा एकदा समोर आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाचा यावरील निर्णय अशा प्रकरणांमध्ये कायद्याचा अर्थ लावण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.''

सत्र न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून जन्मठेप आणि ५,००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती. आता मुंबई उच्च न्यायालय आरोपीचा युक्तिवाद ग्राह्य धरून शिक्षेत बदल करते की सत्र न्यायालयाचा निर्णय कायम ठेवते, याकडे संपूर्ण कायदेविश्वाचे लक्ष लागले आहे. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला असून आपला निकाल राखून ठेवला आहे.

पान १ वरुन

## इराण युद्धात ...

प्रमाणात कमी बसत आहे. मोदी यांनी आकडेवारी देताना सांगितलं की, दशकभरापूर्वी पेट्रोलमध्ये केवळ १% इथेनॉल मिश्रण होत होतं. आता भारत २०% मिश्रणाच्या लक्ष्याच्या जवळ पोहोचला आहे. यामुळे गेल्या वर्षी सुमारे ४.५ कोटी बॅरल तेल आयात टळलं.

भारत मोठ्या प्रमाणात आखाती देशांकडून तेल आयात करतो. इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील संघर्षामुळे या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ होत असून जागतिक बाजारपेठेत अस्थिरता वाढली आहे.

ई२० इंधनामध्ये ८०% पेट्रोल तर २०% इथेनॉल असे मिश्रण असते. याचा उद्देश हा तेल आयात कमी करणे, कार्बन उत्सर्जन घटवणे आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मदत असा आहे.

ई२० पेट्रोलमुळे काही समस्या असल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. त्यामध्ये जुन्या वाहनांमध्ये इंजिनवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्याचसोबत मायलेज कमी होण्याच्या तक्रारी येत आहेत.

तरीही सरकार या धोरणाला दीर्घकालीन फायद्याचे मानते.

All India Distillers Association (AIDA) ने २०% पेक्षा अधिक इथेनॉल मिश्रण पुरवठा करण्याची तयारी दर्शवली आहे. तसेच, इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण टप्प्याटप्प्याने ३०% पर्यंत वाढवण्याची मागणीही करण्यात आली आहे.

## ८ दिवसांत...

प्रशासनाच्या निष्क्रियतेवर सडकून टीका केली. ''प्रभागातील नाल्यांची साफसफाई पूर्णपणे ठप्प झाली आहे. नाल्यांमधून काढलेला कचरा आठ-आठ दिवस रस्त्यावरच पडून राहतो. ही केवळ निष्काळजीपणा नाही, तर नागरिकांच्या आरोग्याशी सरळसरळ खेळ आहे,'' असा गंभीर आरोप त्यांनी केला.

**तक्रारी करूनही प्रतिसाद नाही; प्रशासनावर दुर्लक्षाचा ठपका**

स्वच्छता निरीक्षकांकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. प्रत्येक वेळी केवळ उडवाउडवीची उत्तरे देऊन वेळ मारून नेली जात असल्यामुळे नागरिकांचा संताप वाढत चालला आहे. यासंदर्भात महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अर्जून गिराम यांनाही तोंडी माहिती देण्यात आली असल्याचे सांगण्यात आले, मात्र प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे पूर्णपणे कानाडोळा केल्याचे चित्र दिसत आहे.

**मस्तगड परिसरात मच्छरांचा प्रादुर्भाव; आजारांचा धोका वाढला**

प्रभागातील मस्तगड हा भाग नदीकाठी असल्यामुळे येथे मच्छरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षभरात एकदाही धूर फवारणी (फॉगिंग) करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोग्य विभाग आणि महानगरपालिका प्रशासन याबाबत निष्क्रिय असल्याची टीका होत आहे.

**नागरिकांचे हाल; दुर्गंधीत जीवन जगण्याची वेळ**

परिसरातील नागरिकांना रोजच घाणीच्या आणि दुर्गंधीयुक्त वातावरणात जीवन जगावे लागत आहे. लहान मुले, वृद्ध आणि महिलांना याचा सर्वाधिक फटका बसत असून अनेकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ''कर वसूल करताना तत्पर असणारे प्रशासन, नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष करत आहे,'' अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

**महापालिकेला अंतिम इशारा; 'कचरा टाकून आंदोलन'ची चेतावणी**

दरम्यान, प्रशासनाला थेट इशारा देत नगरसेवक महावीर ढक्का यांनी सांगितले की, येत्या आठ दिवसांत स्वच्छता आणि नागरी समस्या मार्गी लागल्या नाहीत, तर स्वच्छता निरीक्षकांच्या घरी कचरा टाकून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची असेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**महानगरपालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह**

एकूणच, प्रभाग क्रमांक ९ मधील बिघडलेली स्वच्छता व्यवस्था ही महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करत आहे. शहराला 'स्वच्छ' बनवण्याचे दावे आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यामधील तफावत स्पष्टपणे दिसून येत आहे. आता प्रशासन यावर तातडीने ठोस पावले उचलून नागरिकांना दिलासा देणार का, की हा प्रश्न आणखी गंभीर होणारयाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## रोजगार मेळाव्याचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींसाठी रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि हुतात्मा जनार्दनमामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तरी जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरी इच्छुक महिला व पुरुष उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्र, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# समाजाचं सहानुभूतीदार; शब्बीर अहमद अन्सारी

आल इंडिया मुस्लीम ओ बी सी आरगनायजेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अहमद अंसारी साहेब राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरचे समारंभ संपल्यानंतर ते जालना येथे येत असत. मी त्यांना जालना येथील रेल्वे गेट, नुतन वसाहत कदिम जालना येथे असलेल्या त्यांच्या घरी भेटत असे. आम्ही त्यांच्याशी केवळ स्थानिकच नव्हे, तर राज्य आणि राष्ट्रीय विषयांवरही चर्चा करत असू. त्याचवेळी, आम्ही अखिल भारतीय मुस्लिम ओबीसी संघटनेच्या कार्यावर आणि मुस्लिम मागासलेल्या वर्गांमधील संबंध व त्यांच्या समस्यांवर चर्चा करत असू. मला शब्बीर अहमद अन्सारी साहेब केवळ एक ओबीसी नेते म्हणूनच नव्हे, तर शैक्षणिक, राजकीय, सामाजिक आणि विशेषतः मुस्लिम ओबीसी मागासलेल्या वर्गांबद्दल कळकळ बाळगणारे आढळले आहेत. शब्बीर अहमद अन्सारी साहेब मूळचे परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्याचे होते आणि त्यांचा जन्म नोव्हेंबर १९४८ मध्ये पाथरी येथे झाला होता, परंतु कुटुंबातील आर्थिक परिस्थितीमुळे, ते लहान असतानाच त्यांचे आई-वडील जालना येथे स्थलांतरित झाले आणि जालना येथील साळी गल्ली कदिम जालना येथे स्थायिक झाले. त्यांच्या सहा भावंडांपैकी, शब्बीर अहमद अन्सारी साहिब यांनी जालना प्राथमिक शाळेत आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आणि नंतर औरंगाबाद चेलिपुरा हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले व दहावीत, विशेषतः गणितात, उत्कृष्ट यश मिळवले. त्यांना १०० टक्के गुण मिळाले. लहानपणापासूनच ते मेहनती आणि हुशार होते आणि त्यांना विज्ञान शिक्षण मिळवण्याची तीव्र इच्छा होती, परंतु कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांच्या शिक्षणाच्या मार्गात नेहमीच अडथळा येत होता. त्याच वेळी, जरी त्यांच्या आईने शिक्षण मिळवण्याच्या मार्गात त्यांना सर्वतोपरी पाठिंबा आणि प्रोत्साहन दिले, तरी मोठे भाऊ आणि कुटुंबातील इतर लोक सतत अडथळे निर्माण करत राहिले, परंतु शब्बीर अहमद अन्सारी यांनी या सर्व अडथळ्यांवर आणि इतर कठीण परिस्थितींवर मात करून आपले शिक्षण सुरू ठेवले. दहावी पूर्ण केल्यानंतर, त्यांनी जालना येथील जेईएस कॉलेज जालना मधून पीयूसीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर, त्यांनी शिलाईच्या क्षेत्रात उत्कृष्ट कौशल्य दाखवून जालना येथे एक प्रसिद्ध आणि नामांकित शिंपी म्हणून स्थान मिळवले. पण एवढ्यावरच समाधान न मानता, शब्बीर अहमद अन्सारी मुंबईला गेले आणि तेथील एका होजिअरी कारखान्यात आपले कौशल्य दाखवून त्यांनी एक विशेष स्थान मिळवले. पण त्यांची नजर नेहमी समाजाच्या मागासलेपणावर होती आणि याच भावनेने त्यांना सतत परिस्थितीची जाणीव ठेवून समाजाचा मागासलेपणा दूर करण्याचे मार्ग शोधण्यास प्रवृत्त केले. मुंबईत राहत असताना, दैनिक वर्तमानपत्रे वाचून आणि परिस्थितीची जाणीव ठेवून शब्बीर अहमद अन्सारी यांना राष्ट्र, समाज आणि समुदायासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळाली. त्याच वेळी, मागासलेल्या वर्गांसाठी संघर्ष करणाऱ्या वकील जनार्दन पाटील आणि पत्रकार कपिल पाटील यांच्या साथीने, त्यांनी राज्यातील मागासलेल्या वर्गांना त्यांचे समुदायांसाठी सरकारचे प्रभावीपणे प्रतिनिधित्व केले. जेव्हा महाराष्ट्र राज्य ओबीसी संघटना संपूर्ण राज्यात अधिक सक्रिय झाली, आणि त्यानंतर, महाराष्ट्र राज्य ओबीसी संघटनेने आपली व्याप्ती वाढवली आणि तिचे रूपांतर अखिल भारतीय मुस्लिम ओबीसी संघटनेत झाले आणि ती राष्ट्रीय आपला काफिला पुढे नेत आहे. दिलीप वाघमारे यांनी मराठीत लिहिलेले शब्बीर अहमद अन्सारी यांचे मंडळनामा हे चरित्र समोर आले असून, मलिक अकबर यांनी अनुवादित केलेले त्याचे उर्दू भाषांतरही २०२४ मध्ये प्रकाशित झाले आहे आणि त्याला व्यापक स्वीकृती मिळाली आहे.



हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी १९८१ मध्ये महाराष्ट्र राज्य ओबीसीची स्थापना केली. मागासलेल्या वर्गांचे, विशेषतः मुस्लिम मागासलेल्या वर्गांचे हक्क आणि सक्षमीकरण करण्यासाठी, तसेच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी संघटना स्थापन झाली आणि संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सक्रिय झाली. ज्यामध्ये त्यांनी तत्कालीन काँग्रेस नेते आणि महाराष्ट्राचे गृहमंत्री असलेले औरंगाबादचे बाबूराव काळे, तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकरराव चौहान आणि दिलीप कुमार यांच्यासारख्या व्यक्तींसोबत राज्यातील मुस्लिम ओबीसी स्तरावर मुस्लिम मागासलेल्या वर्गांसाठी सक्रिय झाली. अखिल भारतीय मुस्लिम ओबीसी संघटना आजही राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यांमध्ये सक्रिय आहे आणि त्याच वेळी, अखिल भारतीय मुस्लिम ओबीसी संघटनेने आपली व्याप्ती देशभरात वाढवली आहे आणि शब्बीर अहमद अन्सारी यांनी हे ध्येय आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. आज, अखिल भारतीय मुस्लिम ओबीसी संघटना देशभरात मुस्लिम मागासलेल्या वर्गांचे हक्क आणि सक्षमीकरण, शिक्षण आणि सामाजिक न्यायासाठी

आज, रविवार, २२ मार्च २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता, राष्ट्राचे दयाळू व्यक्तिमत्व आणि अखिल भारतीय मुस्लिम ओबीसी संघटनेचे नेते शब्बीर अहमद अन्सारी साहिब आपल्या खऱ्या स्वामीकडे गेले आहेत. भारतातील मागासलेले वर्ग, विशेषतः मुस्लिम मागासलेले वर्ग, त्यांना कधीही विसरू शकणार नाहीत. अल्लाह रबबुल आलमिन त्यांना मोठे प्रतिफळ देवो आणि दयेच्या क्षेत्रात त्यांना उच्च स्थान देवो हीच प्रार्थना आमिन या रबबुल आलमिन.

**- लियाकत अली खान**
**यासिर जालनवी**
**०९४२२७२४२५७**

मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल आतरिक्त मुख्य सचिवाना निर्देश जारी

# मुंबई ठाणे प्रमाणे शहर वासियांना सुद्धा कायमस्वरूपी मालमत्ता कर माफी द्या - डॉ राजेंद्र दाते पाटील

**मुंबई । प्रतिनिधी -** मुंबई ठाणे मनपाच्या धर्तीवर औरंगाबाद मनपा क्षेत्रात ८०० ते १००० चौरस फुटांपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या घरांना कायमस्वरूपी मालमत्ता करमाफी द्यावी अशी मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि शहर विकासाचे जेष्ठअभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी राज्य शासना कडे केली असता या विषयाची एवढ्या व्यस्ततेत मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने दखल योग्य त्या निर्देशां सह हा प्रस्ताव अतिरिक्त मुख्य सचिव डॉ गोविंदराज यांचे कडे पाठवला असल्याचा मेल डॉ राजेंद्र दाते पाटील यांना प्राप्त झाला असल्यामुळे नेहमी प्रमाणे मुख्यमंत्र्यांनी त्यांचे निवेदनाची दखल घेऊन वेगळेच संकेत दिल्याचे स्पष्ट होत आहे.

पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक आणि डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी पूर्वी केलेल्या मागणीची तत्कालीन मुख्यमंत्री यांनी तात्काळ दाखल घेत सदरची मागणी पुढील कारवाई साठी नगररचना विभाग महाराष्ट्र शासन यांना पाठवला होता.

नेमक्या डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी सूचित केल्या प्रमाणे जनहितार्थ हा ठराव चर्चेत आला आणि त्याच धर्तीवर मुंबई मनपा मध्ये याच धर्तीवर

नुकतेच ठाणे महापालीकेच्या वतीने ५०० चौरस फुटांपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या घरांना मालमत्ता करमाफी देण्याचा ठराव सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला होता. सत्ताधारी सह ठाण्यातील सर्वपक्षीय नगरसेवकांनी सर्वानुमते या ठरावाला मंजुरी दिली.हीच मागणी आणि अपेक्षा त्यांनी औरंगाबाद मनपा प्रशासन आणि पदाधिकारी व सर्व पक्षीय नगरसेवका कडे केली आहे.



मनपा प्रशासना कडून मुंबईत हा प्रस्ताव राज्य शासना कडे पाठवून त्यांस मंजुरी घेऊन त्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. करमाफी मुळे महापालिकेच्या उत्पन्नावर परिणाम होण्याची शक्यता असली तरी आता छत्रपती संभाजीनगर शहराची निवड" स्मार्ट सिटी प्रकल्पात "झालेली असल्यामुळे उत्पन्नात मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे.याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर महानगर पालीका क्षेत्रात सुद्धा वरील नमुद प्रमाणे जनहितार्थ कायम स्वरूपी निर्णय घेणेसाठी प्रशासक/आयुक्त मनपा छत्रपती संभाजी नगर यांना निर्देशीत करावे आणि तसा सकारात्मक ठराव शासनाकडे पाठवण्याचे निर्देश व्हावेत ही विनंती करण्यात आली आहे.

शहर वासीयांना दिलासा देण्या साठी विषयांकित ठराव आयुक्त -प्रशासक,मनपा छत्रपती संभाजीनगर यांनी करावा म्हणुन तसे निर्देश होणे गरजेचे आहे.राज्य सरकारने वरील विषयांकित निर्णय करणे साठी तात्काळ निर्णय घेतला जाण्याची प्रचंड मोठी गरज आहे.

म्हणुन मुंबई-ठाणे मनपाच्या धर्तीवर औरंगाबाद मनपा क्षेत्रात ८०० ते १००० चौरस फुटांपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या घरांना व मालमत्ताना करमाफी कायम स्वरूपी देण्याचे निर्देश नगर विकास विभागास होणे आणि त्या अनुषंगाने आयुक्त प्रशासक मनपा छत्रपती संभाजी नगर यांनी उपरोक्त प्रमाणे मंजुरी घेणे बाबतचा ठराव राज्य शासना कडे पाठविण्याचे तात्काळ जनहितार्थ आदेश व्हावेत ही जनहितार्थ विनंती राज्य शासनास या पूर्वीच करण्यात आलेली असुन आता लोक नियुक्त सदस्य नगरसेवक म्हणुन निवडून आलेले असल्या मुळे सर्व पक्षीय नगरसेवकांनी एक मुखी ठराव करून वरील प्रमाणे ठराव शासनास पाठवावा अशी विनंती व मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि शहर विकासाचे जेष्ठअभ्यासक जनआंदोलन विकास कृती समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी केली असुन या अनुषंगाचे पत्र देखील त्यांनी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे.




# गरजू रुग्णांना तत्काळ उपचार मिळवून देणे हीच खरी मानवसेवा - राजेश राऊत

## स्व. गणपतराव पवार यांच्या स्मृत्यर्थ मोफत शिबिरात १२६ जणांची नेत्र तपासणी

**जालना । प्रतिनिधी -** स्व. गणपतराव पवार यांनी आयुष्यभर जनसेवेचे व्रत जोपासले. त्यांचा हाच वारसा पवार कुटुंबिय आणि सेवाभावी संस्था पुढे नेत आहे, ही कौतुकास्पद बाब आहे. गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देणे हीच खरी मानवसेवा आहे. आजच्या काळात डोळ्यांचे आरोग्य जपण्याचे मोठे आव्हान असून, अशा शिबिरांमुळे सामान्य नागरिकांना मोठा आधार मिळतो, असे प्रतिपादन उपमहापौर राजेश राऊत यांनी येथे केले.

स्व. गणपतराव पवार यांच्या स्मृत्यर्थ स्व. गणपतराव पवार सेवाभावी संस्था आणि भारतीय जैन संघटना, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. २३ मार्च रोजी हॉटेल न्यू इंद्रायणी येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन श्री. राऊत यांच्याहस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक गणेशराव राऊत यांची उपस्थिती होती. या शिबिरात १२६ जणांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ९ जणांना मोतीबिंदूचे निदान झाले असून, त्यांच्यावर चिकलठाणा येथील लायन्स नेत्रालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

या रुग्णांची जाण्या येण्याची आणि शस्त्रक्रियेनंतर आवश्यक औषधींची व्यवस्था पवार परिवाराच्यावतीने करण्यात येणार आहे. प्रास्ताविकपर भाषणात रामेश्वर पवार म्हणाले की, वडील स्व. गणपतराव पवार यांचे विचार आणि त्यांनी दिलेली समाजसेवेची शिकवण आमच्यासाठी कायम प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमातून गोरगरीब आणि गरजू रुग्णांच्या जीवनात प्रकाशाची किरणे पोहचवण्याचा आमचा मानस आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, भविष्यातही अशाच प्रकारचे लोकोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जातील.

या प्रसंगी संजय पवार, रामेश्वर पवार, श्याम पवार, साईनाथ पवार, सूरज पवार, कुणाल पवार, प्रकाश शेळके, रावसाहेब पवार, विजय खरात, बालू झुंजुर्डे, संदीप धागे, अरुण वझरकर, डॉ. अनिल बोडखे, शुभम राऊत, दिनेश आदमाने,





भारतीय जैन संघटनेचे शहर अध्यक्ष राजेश लुनिया, माजी नगरसेवक राधाकिशन दाभाडे, जनकल्याण रक्तपेढीचे शिवराज जाधव, रघुवीर जायसवाल, श्याम भारतीय, शैलेश देशमुख, भारत गावणे, अशोक जोगदंड, अजय मिरकड, संदीप ढगे, विलास पवार, राजू श्रीसागर, अनिल खिल्लारे आदींची उपस्थिती होती.

# शंकर महाराज भक्तांसाठी पाद्यपूजा व भिक्षाफेरीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील सर्व शंकर महाराज भक्तांसाठी येत्या दि. २७ मार्च २०२६, शुक्रवार रोजी प.पू. श्री गुरुदेव स्वर सिद्धनाथ पं. डॉ. पराग श्रीराम चौधरी तसेच प.पू. सौ. गुरुमाऊली सिद्धानंदीनाथ माता सौ. मीनाक्षी पराग चौधरी यांचे जालन्यात पावन आगमन होणार आहे.

या पवित्र प्रसंगी प.पू. शंकर महाराज यांच्या चमत्कारी पादुकांचे पाद्यपूजन तसेच भक्तिभावाने परिपूर्ण अशी भिक्षाफेरी आयोजित करण्यात आली आहे. या दिवशी भाविकांना अध्यात्मिक समाधान, गुरुकृपा आणि भक्तीमय वातावरणाचा लाभ घेण्याची अनमोल संधी मिळणार आहे.विशेष म्हणजे, ज्या साधकांना आपल्या निवासस्थानी पाद्यपूजा आयोजित करावयाची आहे, त्यांनी आपली नावे लवकरात लवकर नोंदवावीत, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. धार्मिक




सोहळ्यात जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होऊन पुण्यलाभ घ्यावा, तसेच गुरुदर्शनाचा लाभ अवश्य घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जालन्यातील सावंगी फाट्याजवळ दोन कारची समोरासमोर धडक; एकाचा मृत्यू

## दुर्दैवी घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात दोन कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एक जण ठार, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात जाफराबाद-टेंभुर्णी रस्त्यावरील सावंगी फाट्याजवळ घडला. विनोद बापूराव कळंबे (वय ४० वर्ष) असे मृताचे, तर रामेश्वर नामदेव नागरे असे जखमीचे नाव आहे. जाफराबाद येथील जिल्हा परिषदेचे शिक्षक विनोद कळंबे हे आपल्या कार (क्र. २१ ९५९५) ने टेंभुर्णीकडे येत होते. त्याच वेळी देऊळगावराजा येथील आरोग्यसेवक रामेश्वर नामदेव नारे हे आपला मित्र गजानन घारे यांच्यासह जाफराबाद तालुक्यातील देऊळझरी येथे बहिणीला भेटण्यासाठी त्यांच्या कार (क्र. २८ ४३२६) ने जात होते. दरम्यान, सावंगी फाट्याजवळ दोन्ही कारची समोरासमोर धडक झाली. कारच्या दिशा बदलल्या. यामध्ये विनोद कळंबे यांची गाडी रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. अपघातानंतर जखमींना तातडीने जालना येथे हलवण्यात आले. दरम्यान, विनोद कळंबे यांना डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. तर जखमी रामेश्वर नागरे यांच्यावर प्राथमिक उपचार टेंभुर्णी ग्रामीण रुग्णालयात



करण्यात आले. या दुर्दैवी घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# प्रभाग क्र. ५ लड्डा कॉलनीतील समस्यांची नगराध्यक्ष प्रतिनिधींकडून प्रत्यक्ष पाहणी

## रस्त्यांची दुरवस्था आणि स्वच्छतेच्या प्रश्नावर नागरिक व पत्रकारांनी वेधले लक्ष

**परतूर । प्रतिनिधी -** शहरातील प्रभाग क्रमांक ५, लड्डा कॉलनी आणि सरताज कॉलनी परिसरातील नागरिकांना सध्या विविध नागरी समस्यांचा सामना करावा लागत आहे. विशेषतः सरताज मशीद समोरील रस्त्याची झालेली दुरवस्था आणि स्वच्छतेचा अभाव या पार्श्वभूमीवर, नगराध्यक्षांचे विशेष प्रतिनिधी श्री. दादू राक्षे यांनी परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

यावेळी उपस्थित पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रभागातील प्रलंबित प्रश्नांचा पाढाच राक्षे यांच्यासमोर वाचला. सरताज मशिदीसमोर रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, येथे तातडीने नवीन रस्ता तयार करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

तसेच परिसरातील नाल्यांची नियमित स्वच्छता करणे, रस्ते झाडून साफ ठेवणे आणि कचरा संकलनासाठी घंटा गाडी नियमितपणे सुरू करावी, अशा मागणी यावेळी करण्यात आली आहे. पाहणी दरम्यान पत्रकार वाजेद सय्यद,पत्रकार मुमताज अन्सारी, पत्रकार तारेख शेख सामाजिक कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''धार्मिक स्थळांच्या परिसरातील स्वच्छता आणि रस्त्यांचे प्रश्न प्राधान्याने सुटणे आवश्यक आहे,'' अशी भावना



यावेळी रहिवाशांनी व्यक्त केली.नगराध्यक्ष प्रतिनिधी श्री. दादू राक्षे यांनी सर्व समस्या शांतपणे ऐकून घेतल्या व संबंधित विभागामार्फत यावर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यामुळे आता प्रशासनाकडून या भागातील रस्ते आणि स्वच्छतेचे प्रश्न किती लवकर सुटतात, याकडे प्रभागातील जनतेचे लक्ष लागले आहे.

# नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी - माजी आ. कैलास गोरंटयाल

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्यावी अशी मागणी जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात गोरंटयाल यांनी म्हटले आहे की, जिल्ह्यातील

जालना, बदनापूर, मंठा आणि घनसावंगी तालुक्यात गारपीट व अवकाळी पाऊस झाला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे.गारपीट आणि अवकाळी



पावसामुळे प्रामुख्याने द्राक्ष आणि आंबा बागांचे अतोनात नुकसान झाले असून फळांची मोठ्या प्रमाणावर गळती झाली आहे.

तसेच कांदा आणि कलिंगड ही नगदी पिके पूर्णपणे सडली असून शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरलेले नाही. रब्बी पिकांचीही वाट लागली असून गहू, हरभरा, ज्वारी ही काढणीला आलेली पिके वादळी वारा आणि गारपिटीमुळे आडवी होऊन पिकांचा दर्जा देखील खालावला असल्याचे निवेदनात नमूद करत गोरंटयाल म्हणाले की, या संकटाने बळीराजाचे आर्थिक कंबरडे मोडले आहे.

प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन बाधित तालुक्यांमध्ये महसूल व कृषी विभागामार्फत तातडीने संयुक्त पंचनामे करून नुकसान निश्चित करावे, पीक विमा कंपन्यांना तात्काळ सर्वेक्षण करून विमा परतावा देण्याचे आदेश द्यावेत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून त्वरीत आर्थिक मदत मिळवून देत त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी या निवेदनात केली आहे.

# देऊळगाव राजा हायस्कूल देऊळगाव राजाचे प्रेमचंद राठोड आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** नैसर्गिक मानव अधिकार सुरक्षा परिषद फोरम यांच्या वतीने देण्यात आलेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार आज दिनांक २३ मार्च २०२६ रोजी देऊळगाव राजा हायस्कूल चे प्रेमचंद राठोड सर यांना सन्मानित करण्यात आले.

देऊळगाव राजा हायस्कूल चे विद्यार्थी प्रिय शिक्षक यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याने शाळेच्या वतीने प्राचार्य श्री आर. बी. कोल्हे, उपप्राचार्य श्री बंड सर ,पर्यवेक्षक श्री जाधव तसेच ज्येष्ठ शिक्षक श्री मुळे यांनी सत्कार केला.


या वेळी सत्काराला संबोधीत करतांना श्री राठोड सरांनी आतापर्यंत ३० वर्षे सेवा केली आणि स्काऊट गाईड मध्ये आतापर्यंत २८ मुलांना राज्य पुरस्कार प्राप्त करून दिले असुन, विविध उपक्रमांतर्गत साक्षरता अभियान ,व्यसन मुक्ती निर्मूलन, प्रभात फेरी द्वारे जनजागृती करून शाळेचे नाव राज्य स्तरावर नेले असल्याचे शाळेचे प्राचार्य रंगनाथ कोल्हे यांनी सांगितले.

या वेळी संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष, कोषाध्यक्ष ,सचिव, संचालक तथा सर्व सदस्य यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक बंधू-भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्री पेरणे सर यांनी केले.

# ओबीसींना न्याय हक्क मिळवून देणारा निस्वार्थ नेता हरपला -ॲड. नाजेर काजी

**जालना । प्रतिनिधी -** आपलं संपूर्ण जीवन वंचित समाजासाठी आणि विशेष करून मुस्लिम ओबीसींना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी व्यतित करणारा निस्वार्थ नेता ज्यांनी कधीही फुले शाहू व आंबेडकर यांच्या समतेच्या विचाराची तडजोड केली नाही असे शब्बीर अहमद अन्सारी यांनी रविवारी जगाचा अखेरचा निरोप घेतला वंचित व ओबीसी समाज त्यांना कधीही विसरणार नाही अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष एडवोकेट नाजीर काजी यांनी व्यक्त करून त्यांना अखेरचा भावपूर्ण निरोप दिला .

ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष शब्बीर अहमद अन्सारी यांचे अल्पशा आजाराने रविवारी दुपारी निधन झाले , त्यांचा दफनविधी राजाबाग शेर सवार मुस्लिम कब्रस्तान मध्ये रात्री दहा वाजता करण्यात आला आहे , यावेळी राज्य भरातून मान्यवर नेते विविध पक्षाचे पदाधिकारी



व जनसागर लोटला होता माजी आ. कपिल पाटील , अरविंदराव चव्हाण , शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव आंबेकर , समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुभाष राऊत , औरंगाबादचे माजी महापौर रशीद मामू , फारूख मुस्तफा , एकबाल पाशा , कल्याण दळे , राजेंद्र राख , अब्दुल हाफिज , भाऊसाहेब घुगे , शेख महमूद , झकी कुरेशी , शहा आलम खान , युसूफ निजामी , प्रा. सत्संग मुंढे , डॉ. प्रकाश इंगळे , संजय इंगळे , शेख. माजेद , सगीर अहमद , नवाब डांगे , आसेफ अन्सारी , डॉ. विशाल धानुरे , कलीम खान , अहमद नुर , इफ्तेखारुद्दीन , मोहन इंगळे , शेख. शकील , एड. अंबादास खर्डेकर , परमेश्वर गरबडे , संदीप खरात , विठ्ठल म्हस्के , इकबाल कुरेशी , बासेद कुरेशी , खालील कुरेशी फिरोज बागवान , अलीम कुरेशी , बाबासाहेब सोनवणे , शेख इब्राहिम , जावेद अली आदी मान्यवरांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करून अखेरचा निरोप दिला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.